**प्रेस नोट** **दि.१३/०४/२०१९**

## खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

## गहाळ झालेली पर्स महिलेस परत

दि.११/०४/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा. चे सुमारास पोलीस उप निरीक्षक श्री मुन्तोडे खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर व स.पो.फौ. बगाडे खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर हे न्यायालयीन कामकाजाकरीता शिवाजीनगर न्यायालय, पुणे येथे जात असताना त्यांना अंडी उबवणी चौकाचे पुढे सार्वजनीक रस्त्यावर एक पर्स पडलेली दिसली. सदर पर्स त्यांनी चेक करुन पाहिली असता त्यामध्ये एक मोबाईल हॅन्डसेट व इतर मौल्यवान साहित्य होते. त्याबाबत त्यांनी सदर मोबाईलचे सहाय्याने खात्री केली असता मोबाईल फोन हा सौ. माधुरी दत्तात्रय गरगडे रा. चक्रपाणी वसाहत, भोसरी, पुणे यांचा असल्याची व त्या खडकी पोलीस ठाणेस त्यांची पर्स हरवल्याबाबत तक्रार नोंदवीणेकामी गेले असलेबाबत त्यांना समजले. त्यावर सदर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सदर महिलेस खडकी पोलीस ठाणेस समक्ष बोलावुन तेथे सदर मोबाईल, पर्स व त्यामधील साहित्य त्यांचेच असलेबाबत खात्री करुन त्यांचे ताब्यात दिले.

सदर उत्कृष्ठ कामगीरी पोलीस उप निरीक्षक श्री मुन्तोडे खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर व स.पो.फौ. बगाडे खडकी पोलीस स्टेशन, पुणे यांनी केली आहे.

**( भागवत मिसाळ )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.